महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

जि. सोलापूर (महाराष्ट्र) – ४१३३०४



—: विषय :—

## बुंदी लाडूप्रसाद पाकीटावर जाहिरात प्रसिध्द करण्याचे हक्क देण्यासाठी नामांकित नोंदणीकृत कंपन्यांकडून अभिव्यक्ती स्वारस्य (EXPRESSION OF INTEREST) मागविणेबाबत

# सन २०१८ – १९

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३ |
| २ | माहिती, अटी व शर्ती. | ४ |
| ३ | जाहिरात तपशिल. | ७ |
| ४ | परिशिष्ट क्र. १ | ९ |
| ५ | परिशिष्ट क्र. २ | १० |
| ६ | परिशिष्ट क्र. ३ | ११ |
| ७ | परिशिष्ट क्र. ४ | १२ |

# प्रस्तावना

पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ च्या तरतुदीनुसार पंढरपूर येथील श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिराचा कारभार दि.२६/०२/१९८५ पासून श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरकडे शासनामार्फत सोपवण्यात आलेला आहे.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीकडे श्री. विठ्ठल रूक्मिणीचे पंढरपूरातील मुख्य मंदिर आणि मंदिरातील ३६ परिवार देवता, तसेच पंढरपूर शहर व परिसरातील २८ परिवार देवता यांचे व्यवस्थापन करण्याचे कामकाज आहे. यासर्व देवदेवतांची पुजा–अर्चा इ. दररोजचे नित्योपचार, नैमत्तिक उपचार मंदिरात व मंदिराबाहेरील परिवार देवतांच्या मंदिरात साजरे करण्यात येणारे यात्रा व उत्सव, वर्षातुन चार वेळा येणाऱ्या आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या चार मोठ्या यात्रा कालावधीत भाविकांची गर्दी मोठया प्रमाणात असते.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर हे दक्षिण काशी म्हणूनही ओळखले जाते. लाखो वारकऱ्यांच्या श्रध्देचे स्थान व उभ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या या दैवताच्या दर्शनासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यातून व देशभरातून वर्षभरात अंदाजे १ कोटीपेक्षा जास्त भाविक भेटी देताता. त्यांना मंदिर समितीकडून पुरेशा प्रमाणात सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

त्यानुसार श्रीचा प्रसाद म्हणून भाविकांना अल्पदरात बुंदी लाडूप्रसाद उपलब्ध करून देण्यात येतो. सदरचा बुंदी लाडूप्रसाद आऊटसोर्सिंग पध्दतीने खरेदी करून, कागदी पिशव्यातून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतो. सदरच्या कागदी पिशव्यांवर समोरील बाजूस समितीची छपाई करण्यात येईल व पाठीमागील बाजूस जाहिरात प्रसिध्द करण्याचे हक्क देण्यात येत आहेत.

सदरचे जाहिरात हक्क दिल्यास समितीच्या उत्पन्नात भर पडून भाविकांना जास्तीतजास्त स्वरूपात सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

# माहिती, अटी व शर्ती

१. मान्यताप्राप्त / नोंदणीकृत कंपन्यांकडून बुंदी लाडूप्रसाद पाकीटवर जाहिरात प्रसिध्द करण्याचे हक्क देणेबाबतचे प्रस्ताव लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत. नमूना प्रस्तावाचा अर्ज कार्यालयीन वेळेत श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील.

२. प्रस्ताव स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून दि. १७/०९/२०१८ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर कंपनीचे नाव व पूर्ण पत्ता आणि **''बुंदी लाडूप्रसाद पाकीट जाहिरात प्रसिध्द करण्याचे हक्क देणेबाबतचा प्रस्ताव''**, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. प्रस्ताव समक्ष कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर यांचे नावे श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोष्टाने पाठवावे. **उशीरा आलेले अथवा अपूर्ण प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.**

३. प्रस्तावासोबत रक्कम रू.२५,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा. सदर रक्कम सदरची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधितांना अदा करण्यात येईल. सदरच्या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

४. श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरच्या वतीने श्रीचा प्रसाद म्हणून भाविकांना अल्प दरात बुंदी लाडूप्रसाद उपलब्ध करून देण्यात येतो. सदरचा बुंदी लाडूप्रसाद आऊटसोर्सिंग पध्दतीने खरेदी करण्यात येतो. सदरच्या बुंदी लाडूप्रसाद कागदी पिशव्यातून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतो. सदरच्या कागदी पिशव्यांवर समोरील बाजूस मंदिर समितीची लाडूप्रसादबाबतची माहिती छपाई करण्यात येईल व पाठीमागील बाजूस जाहिरात प्रसिध्द करण्याचे हक्क देण्यात येत आहेत.

५. सदर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी परवानगी दिल्यास, त्याबदल्यात मंदिर समितीस द्यावयाची रक्कम अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

६. सदर जाहिरातीचा नमुना, स्वरूप, तपशिल समितीकडून मान्य करून घेवून, तद्‌नंतर जाहिरात छपाई करणे आवश्यक आहे. समितीच्या लेखी परवानगी शिवाय छपाई करता येणार नाही. जाहिरात करावयाचा तपशील हा प्रति महिन्या नंतरच बदल येईल, एक महिन्यापेक्षा कमी कालावधी मध्ये लाडू पाकिटावरील जाहिरात बदलता येणार नाही. तसे आढळल्यास आपला प्रस्ताव रद्द करून कंपनीवर कठोर स्वरूपाची कायदेशिर व फौजदारी कारवाई करण्यात येईल.

७. **श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर हे देशातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असल्याने, सदरची जाहिरात ही अश्लिल स्वरूपाची असता कामा नये. तसेच मद्य, गुटखा, पानमसाला, तंबाखू, सिगारेट, सौदर्य प्रसाधने, अंतवस्त्रे तसेच कुठल्याही धार्मिक / सामाजिक / राजकीय भावना दुखवणारी / कोणत्याही व्यक्तीची खाजगी जाहिरात असता कामा नये. वर उल्लेख केलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील कोणतीही जाहिरात कोणत्याही वेळी नाकारण्याचा अधिकार मंदिर समिती उपसमितीला आहे.**

८. सदर जाहिरात प्रसिध्दी करणाचे हक्क देण्याचा कालावधी प्रस्ताव मंजुर झाल्यापासून एक वर्ष राहील.

९. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

१०. प्राप्त प्रस्ताव दि. १९/०९/२०१८ रोजी स.११.०० वा. समितीच्या कार्यालयात उघडण्यात येतील.

११. सदरबाबत दि. १०/०९/२०१८ रोजी स.११.०० वा. समितीच्या कार्यालयात प्रीबीड बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी काही सुचना अथवा हरकती असल्यास आपणास उपस्थित राहून, त्यादिवशी मांडता येतील.

१२. कोणताही प्रस्ताव / सर्व प्रस्ताव कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे याबाबतचे संपूर्ण अधिकार कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

१३. कंपन्यांच्या कोणत्याही अटी व शर्ती समितीवर बंधनकारक असणार नाहीत. तसेच सदर जाहिरातीमुळे भाविकांच्या श्रध्देस अथवा मंदिर समितीच्या प्रतिमेस तडा गेल्यास, आपला प्रस्ताव व जाहिरात कोणतेही कारण न देता एकतर्फी रद्द करण्यात येईल.

१४. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल त्या कंपन्यांवर बंधनकारक राहतील.

१५. सदर जाहिरात हक्क प्रसिध्दीकामी जाहिरात कंपनी / उत्पादक कंपनीकडून द्यावयाची रक्कम / रॉयल्टी एकरक्कमी भरावी लागेल. तसेच त्यावर प्रचलित दराने जीएसटी अदा करावा लागेल.

१६. प्रस्ताव ज्यांचे नांवे मंजूर होईल, त्यांनी रक्कम रू.५००/— चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (Affidavit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१७. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर, जि. सोलापूर हे राहील.

१८. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस संबंधितास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर प्रस्ताव कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

१९. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

२०. जो प्रस्तावधारक जास्तीत जास्त रक्कम देणेस तयार आहे. त्या कंपनीचा प्रस्ताव मंजुर करणेत येईल.

२१. मंदिर उपसमितीने मान्य केलेल्या मसुद्या व्यतिरिक्त कोणताही इतर मजकूर संबंधित जाहिरात यंत्रणेने प्रसिध्द करावयाचा आहे.


२२. सदरबाबत महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

# जाहिरात तपशिल

## सदरच्या जाहिरात प्रसिध्द करणाचे हक्क देण्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(अ) बुंदी लाडूप्रसाद पॅकेट तपशिल :–



१. सदरचे बुंदी लाडूप्रसाद पॅकेट फोर कलरमध्ये छपाई करून देणे आवश्यक आहे. त्यामध्ये समोरील बाजूस मंदिर समितीची माहिती राहील व पाठीमागील बाजूस जाहिरात प्रसिध्द करणे योग्य होईल.

२. सदर बुंदी लाडूप्रसाद पॅकेट 50 gsm Poster Paper, Poly Coated Paper Roll – Printed-Size 7x6 Inches असे राहील.

३. या बुंदी लाडूप्रसादाची विक्रीची अंदाजित संख्या खालीलप्रमाणे आहे. सदर बुंदी लाडूप्रसाद विक्रीमध्ये मंदिरात येणाऱ्या भाविकांची संख्या कमी / जास्त झाल्यामुळे मागणी कमी व जास्त होऊ शकते.

| अ. क्र. | तपशिल | अंदाजित संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | प्रतिदिन बुंदी लाडूप्रसाद पॅकेट विक्री. | ७००० | |
| २ | मासिक बुंदी लाडूप्रसाद पॅकेट विक्री. | २१०००० | |
| ३ | वार्षिक बुंदी लाडूप्रसाद पॅकेट विक्री. | २५५५००० | |

# जाहिरातीचे हक्क देण्यासाठी विविध नामांकित कंपन्यांकडून अभिव्यक्त स्वारस्य (EXPRESSION OF INTEREST) मागविणेबाबतचे अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र.

(रू.१००/— चे स्टॅम्पपेपरवर नोटरी करून देणे)

मी / आम्ही खाली सही करणार श्री./श्रीमती ——————————————————— श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे जाहिरातीचे हक्क देण्यासाठी विविध नामांकित कंपन्यांकडून अभिव्यक्त स्वारस्य (EXPRESSION OF INTEREST) मागविणेबाबत श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या होणाऱ्या मंजुरी आदेशान्वये अंतिम करण्यात येणारे काम करण्याची व रक्कम अदा करण्याची आमची / माझी तयारी आहे. सदर स्विकृतीबाबत स्वाक्षरीत प्रस्ताव सादर करत आहे / आहोत. तसेच या संमतीपत्राद्वारे मी / आम्ही घोषित करत आहे / आहोत की, सोबतच्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या आहेत. सदरच्या सर्व अटी आम्हांस मान्य असून त्या आमच्यावर बंधनकारक राहतील. अर्जामध्ये देण्यात आलेली माहिती सत्य असून बरोबर आहे.

१) कंपनीधारकाचे नांव :—

२) पत्ता :—

सही व शिक्का

**परिशिष्ट ०२**

## प्रस्तावधारकाची आवश्यक माहिती

१. पूर्ण नांव :— ————————————————————————————————————————

२. संपूर्ण पत्ता :— ———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

मोबाईल नं.:— ई—मेल:—

३. कंपनी नोंदणी क्रमांक :— ———————————————————————————————————

४. आयकर प्रमाणपत्र :—

(१) पॅन क्रमांक :— ————————————————————————————————————

(२) मागील तीन वर्षाचे आयकर रिटर्न प्रमाणपत्र :— सन २०१५—१६, २०१६—१७

व २०१७—१८

५. जीएसटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र क्रमांक :————————————————————————————

६. व्यवसायाच्या संबंधी पूर्व अनुभव :———————————————————————————————

————————————————————————————————————————————————

वरील प्रमाणे प्रस्तुत प्रस्तावासोबत माहिती आवश्यक त्या पुराव्याच्या कागदापत्रासह सोबत सादर करत आहे. अर्जात नमुद माहिती व सोबतचे सर्व कागदपत्रे सत्य व बरोबर आहेत. तसेच सोबतच्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असून त्या आमचेवर / माझेवर बंधनकारक राहतील.

स्थळ :—

दिनांक :— नांव व स्वाक्षरी /—

## <u>प्रस्तावासोबत जोडावयाच्या कागदपत्रांचा तपशिल</u>

१. विहित नमुन्यातील अर्ज.

२. पॅन नोंदणी क्रमांक (पॅन कार्ड).

३. कंपनीचे / फर्मचे नोंदणी प्रमाणपत्र.

४. अनुभव प्रमाणपत्रे.

५. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

६. बयाणा रक्कमेचा डी.डी/ जमा पावतीची झेरॉक्स प्रत.

७. परिशिष्ठ १ ते ४.

**टिप :– वरील सर्व कागदपत्रांवर अर्जदाराने स्वाक्षरी करावी.**

परिशिष्ट ०४

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

जि.सोलापूर (महाराष्ट्र) ४१३३०४

**<u>अभिव्यक्ती स्वारस्य (EXPRESSION OF INTEREST) दरपत्रक</u>**

१. कंपनीचे / फर्मचे नांव :– ————————————————————————————

————————————————————————————

२. संपूर्ण पत्ता :– ————————————————————————————

————————————————————————————

३. दुरध्वनी क्रमांक / मोबाईल नं.:–——————————————————————

| अ. क्र. | तपशिल | जाहिरातीत नमुद करावयाचा तपशिल (संक्षिप्त स्वरूपात) | वार्षिक रक्कम रू. (जीएसटी वगळून) |
|---|---|---|---|
| १ | बुंदी लाडूप्रसाद पॅकेट | | |
| | एकूण | | |

**<u>अतिशय महत्वाचे :– जाहिरातीत नमुद करावयाच्या तपशिलासाठी जाहिरातीचे स्वतंत्र नमुने जोडावेत. ते मंदिर समितीच्या उपसमितीसमोर ठेवण्यात येतील. उपसमितीच्या मान्यतेनंतर त्याबाबत योग्य ती परवानगी देण्यात येईल.</u>**

वरील रक्कम संबंधित जाहिरात हक्कासाठी देण्यात आलेले आहेत. सदरची रक्कम एकरकमी भरण्याची कंपनीची तयारी आहे. तसेच याबाबतच्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र तयार करून देण्यास तयार आहे. त्यानुसार सदरचे जाहिरात हक्क आमच्या कंपनीस / फर्मस मिळणेस विनंती आहे.

ठिकाण :

दिनांक : शिक्का व सही/–